मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# दत्त मंदिर रस्त्यावर संतप्त नागरिकांचा ठिय्या!

## कुठलाही मोबदला अथवा नोटिसा न देता थेट कारवाई करण्यात आल्याचा आरोप

**पिंपरी | प्रतिनिधी**

दत्त मंदिर रस्त्यावरील शेकडो अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे महापालिकेच्या अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम निर्मूलन पथकाने सोमवारी (ता. ६) जोरदार कारवाई करत हटविली. मात्र, कुठलाही मोबदला अथवा नोटिसा न देता थेट कारवाई करण्यात झाल्याचा आरोप करत शेकडो रहिवासी व व्यावसायिकांनी ठिय्या आंदोलन करत रस्ता अडविल्याने काही काळ सर्वांचीच तारांबळ उडाली.



सध्या वाकड येथील दत्त मंदिर रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम सुरू आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी झालेली अतिक्रमणे काढण्याबाबत महापालिकेच्यावतीने भोंग्याद्वारे सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र तरीही ते न काढल्याने सोमवारी कारवाईला सुरुवात झाली. एक पोकलेन, तीन जेसीबी व पाच डंपरच्या साहाय्याने बेधडक कारवाई करण्यात आली. परंतु; न्यू दत्तनगर येथे पूर्वीचा मोबदला अद्याप मिळाला नाही, असा आरोप करत जमलेल्या शेकडो रहिवासी व व्यावसायिकांनी वाकड दत्त मंदिर रस्त्यावरच ठिय्या आंदोलन केले. तसेच रस्ता अडवून धरला.

> वाकड दत्त मंदिर रस्त्याचे रुंदीकरण सुरू आहे. नोटिसा देऊनही रस्त्यातील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे हटविण्यात न आल्याने ती कारवाई करून काढण्यात आली. काही घरांना एक दिवसाची मुदतवाढ देण्यात आली आहे. तर; काहींचा 'अ', 'ब' पत्राचा विषय बाकी होता. त्याबाबत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्यांचे समाधान केले आहे.
>
> **- मनोज लोणकर, उपायुक्त, महापालिका.**

तब्बल अर्धा तासाहून अधिक काळ रस्ता रोको केल्याने प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती. अखेर काही अधिकाऱ्यांनी आंदोलकांसह बाधित रहिवाशांची भेट घेऊन मोबदल्याचा विषय मार्गी लावू तसेच कारवाईला एक दिवस वाढवून दिल्याचे आश्वासन देताच गर्दी पांगली. उपायुक्त मनोज लोणकर, 'ग' क्षेत्रीय अधिकारी श्रीकांत कोळप, कार्यकारी अभियंता संध्या वाघ, अशोक कुठे, अमोल पडलवार, वाकड ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक निवृत्ती कोल्हटकर आदी उपस्थित होते.

---

# बांगलादेशी, रोहिंग्यांच्या बंदोबस्तासाठी पोलिसांचा आता 'सर्जिकल स्ट्राईक'

## आमदार लांडगे यांची लक्षवेधी अन् पोलिसांकडून 'ॲक्शन' : देशाच्या सुरक्षेबाबत सरकारचे 'नो कॉम्प्रमाईज'

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये गेल्या वर्षभरात ३३ घुसखोर बांगादेशींना पिंपरी- चिंचवड पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. यापुढील काळात ही कारवाई आणखी तीव्र करण्यात येईल. चिखली-कुदळवाडीतील बेकायदा भंगार दुकानांचा बंदोबस्त करण्यात येणार आहे. शहर आणि देशाच्या सुरक्षेबाबत कोणत्याही प्रकाराने 'कॉम्प्रमाईज' करण्यात येणार नाही, अशी आक्रमक भूमिका भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.



पिंपरी- चिंचवड शहरांमधील म्हाळुंगे, निगडी, पिंपरी, भोसरी, भोसरी एमआयडीसी, सांगवी, दापोडी, चाकण, तळेगाव एमआयडीसी आणि देहूरोड या परिसरात बांगलादेश आणि रोहिंग्ये यांना अटक केली आहे. सर्वाधिक बांगलादेशी हे भोसरी परिसरातून अटक करण्यात आले आहेत. भोसरीमध्ये वर्षभरात १२ बांगलादेशींना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. हे सर्व बांगलादेशी हे बनावट कागदपत्रांद्वारे परिसरात राहत होते. आधार कार्ड, पॅन कार्ड यासह इतर कागदपत्र ही नेहमीच या बांगलादेशकडून जप्त करण्यात आलेले आहेत.

> पिंपरी-चिंचवडमध्ये या बांगलादेशींना नेमकं बनावट कागदपत्र कोण बनवून देतो. या मुळापर्यंत पोहचणे देखील पोलिसांची जबाबदारी आहे. बांगलादेशांना आणि रोहिंग्यांची बोगस पासपोर्टदेखील रद्द करण्याची आवश्यकता आहे. बांगलादेशी आणि रोहिंग्ये यांना शोधण्याची मोहीम अधिक तीव्र करावी, अशी अपेक्षा आहे. कुदळवाडी- चिखलीतील अतिक्रमण कारवाई, कामगार नोंदणीबाबत तपासणी करण्यासाठी प्रशासनाने कालबद्ध कार्यवाही करावी, अशी सूचना करण्यात आली आहे.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

दरम्यान, आमदार महेश लांडगे यांनी हिवाळी अधिवेशनामध्ये बांगलादेशी आणि रोहिंग्यांच्या प्रश्नावर राज्य सरकारचे लक्ष वेधले होते. ही बाब राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाची असल्यामुळे सरकार चौकशी करुन कारवाई करेल, असे आश्वासन मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले होते. त्यानंतर प्रशासन 'ॲक्शन मोड' वर आले आणि कुदळवाडी- चिखली परिसरात अतिक्रमण कारवाई करण्यात आली. त्यामध्ये बेकायदा भंगार दुकाने आणि बांगलादेशी घुसखोरांची आश्रयस्थळे जमीनदोस्त करण्यात आली.

# 'HMPV'चा धोका वाढताच पालिका ॲक्शन मोडवर

## नायडू संसर्गजन्य रुग्णालयात विलगीकरणाची व्यवस्था अन् रुग्ण सर्वेक्षण

**पुणे | प्रतिनिधी**

ह्युमन मेटान्यूमोव्हायरस (एचएमपीव्ही) या साथरोगाचा धोका वाढू लागला आहे. या पार्श्वभूमीवर पुणे महापालिकेने खबरदारीची पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. नायडू संसर्गजन्य रुग्णालयात विलगीकरणासाठी ५० रुग्णशय्या आणि ५ अतिदक्षता रुग्णशय्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. याचबरोबर शहरातील सर्दी, खोकल्याच्या रुग्णांचे सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे.



महापालिकेच्या आरोग्य विभागाने राज्य सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार एचएमपीव्हीचा संसर्गाबाबत खबरदारीची पावले उचलली आहेत. करोना साथीनंतर महापालिकेने भविष्यात संसर्गजन्य आजाराची साथ आल्यास नायडू रुग्णालयात रुग्णशय्यांची व्यवस्था केली आहे. त्यानुसार, त्यात नायडू संसर्गजन्य रुग्णालयात विलगीकरणासाठी ५० रुग्णशय्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. भविष्यात एचएमपीव्हीची साथ वाढल्यास त्यासाठी नायडू रुग्णालयांत विलगीकरणासाठी ३५० रुग्णशय्यांची व्यवस्था आहे. याचबरोबर खासगी रुग्णालयांची मदत घेऊन विलगीकरणासाठी ३ हजार ५०० रुग्णशय्यांची व्यवस्था करण्याचे महापालिकेचे नियोजन आहे.

सर्दी, खोकल्याचे रुग्ण महापालिकेच्या दवाखान्यात आल्यास त्यांची स्वतंत्र नोंद ठेवण्याचे निर्देश महापालिकेच्या आरोग्य प्रमुख डॉ. नीना बोराडे यांनी दिले आहेत. या रुग्णांची संख्या आणि त्यांची लक्षणे यावर बारकाईने लक्ष ठेवले जाणार आहे. रुग्णांची संख्या वाढत आहे का आणि त्यांच्यात इतर कोणती लक्षणे दिसून येत आहेत का, याची तपासणी सातत्याने केली जाणार आहे. यामुळे रुग्णांची संख्या वाढल्यास आणि इतर लक्षणे दिसून आल्यास आरोग्य विभाग तातडीने पावले उचलू शकणार आहे.

### अतिदक्षता म्हणून 'या' गोष्टी कराव्या :

- खोकताना किंवा शिंकताना तोंडावर व नाकावर रुमाल ठेवावा. सॅनिटायझरनं हात वारंवार धुवावेत.
- ताप, खोकला आणि शिंका येत असल्यास सार्वजनिक ठिकाणांपासून दूर राहा.
- भरपूर पाणी प्या आणि पौष्टिक अन्न खा.
- संक्रमण कमी करण्यासाठी व्हेंटीलेशन होईल, याची दक्षता घ्या.

### 'या' गोष्टी टाळा :

खोकलेल्या किंवा शिंकलेल्या हातांनी हस्तांदोलन करणं टाळावं.

टिश्यू पेपरचा वापर केल्यानंतर तो कचरा पेटीत टाकावा.

वारंवार एकाच टिश्यू पेपरचा वापर करणं टाळावं.

आजारी लोकांपासून लांब राहावं.

व्हायरल इन्फेक्शन झालेलं असल्यास शक्यतो रुग्णाच्या जवळ जाऊ नये.

डोळे, नाक आणि तोंडाला वारंवार स्पर्श करू नये.

> “एचएमपीव्हीबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत. महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून सर्दी-खोकल्याच्या रुग्णांचे सर्वेक्षण केले जाणार आहे. याचबरोबर खासगी डॉक्टरांची बैठक घेऊन त्यांनाही सर्दी, खोकल्याच्या रुग्णांचे सर्वेक्षण करण्याच्या सूचना केल्या जाणार आहेत.
>
> **- डॉ. नीना बोराडे, आरोग्यप्रमुख, पुणे महापालिका.**

# निगडीपर्यंत मेट्रोमुळे वाढणार कनेक्टिव्हिटी!

## चिंचवड, आकुर्डी, निगडी स्थानके : तळवडे, किवळे, मामुर्डी, रावेतच्या प्रवाशांची सोय

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे मेट्रोच्या स्वारगेट ते पिंपरी (पीसीएमसी) मार्गिकेचा निगडीतील भक्तिशक्ती चौकापर्यंत विस्तार केला जाणार आहे. त्याचे काम सुरू झाले आहे. यामुळे मुंबई-पुणे महामार्गाच्या परिसरातील चिंचवड, आकुर्डी, निगडी या गावांसह चिखली, तळवडे, संभाजीनगर, शाहूनगर, यमुनानगर, प्राधिकरण, रावेत, किवळे, मामुर्डी या गावांचीही कनेक्टिव्हिटी वाढणार आहे.



पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील पुणे मेट्रोच्या दोन मार्गांवर प्रवासी सेवा सुरू झाली आहे. स्वारगेट ते पिंपरी (पिंपरी-चिंचवड महापालिका भवन - पीसीएमसी) आणि पुण्यातील वनाज ते रामवाडी असे हे दोन मार्ग आहेत. या दोन्ही मार्गांवर प्रवासी वाहतूक सुरू झाली आहे. त्यामुळे पिंपरी, चिंचवड, भोसरी, पूर्णानगर, मोरवाडी, नेहरूनगर, संत तुकारामनगर, पिंपळे सौदागर, सांगवी, दापोडी, कासारवाडी, फुगेवाडी, काळेवाडी, जाधववाडी, मोशी आदी भागातील नागरिकांना पुण्यात जाणे सोयीचे झाले आहे. या भागांना जोडण्यासाठी पुणे महानगर परिवहन महामंडळाने (पीएमपी) मेट्रो स्थानकांशी जोडणारी बससेवा सुरू केली आहे.

काही जण स्वतःच्या दुचाकीने किंवा रिक्षाने मेट्रो स्थानकांपर्यंत येऊन पुढील प्रवास मेट्रोने करत आहेत. त्यामुळे शहरातील पिंपरी, संत तुकारामनगर, नाशिक फाटा, कासारवाडी, फुगेवाडी, दापोडी स्थानकांवर प्रवाशांची संख्या वाढू लागली आहे. कारण, पुणे न्यायालय स्थानकावर उतरून कोथरूड, कर्वेनगर, वनाज आणि पुणे स्टेशन, येरवडा, रामवाडी भागात जाणे सहज सोपे झाले आहे.

आता या स्वारगेट-पिंपरी मार्गिकेचा विस्तार निगडीतील भक्ती-शक्ती चौकापर्यंत केला जाणार आहे. त्याचे काम सुरू झाले आहे. पुढील दोन वर्षात प्रवासी सेवा सुरू होण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे शहराच्या उर्वरित भागातील विशेषतः मुंबई-पुणे महामार्गाच्या दोन्ही बाजूच्या गावांची कनेक्टिव्हिटी मेट्रोने वाढणार आहे. शिवाय, हे दोन्ही बाजूंची गावेही पीएमपीने मेट्रो स्थानकाशी जोडली जाणार आहेत.

> “निगडीपर्यंत मेट्रो आल्यामुळे तळवडे, रुपीनगर, त्रिवेणीनगर भागातून पुण्यात जाणाऱ्यांची सोय होईल. शिवाय, पीएमपीच्या तुलनेने प्रवास जलद होईल. नोकरदार व विद्यार्थ्यांसह अन्य प्रवाशांनाही मेट्रो सोयीची होईल. वाहतूक कोंडीत न अडकता इच्छित ठिकाणी वेळेत पोहोचता येईल.
>
> **- पूनम डिंगोरे, नोकरदार, त्रिवेणीनगर, निगडी.**

### पिंपरी स्थानकाशी किवळे 'कनेक्ट'

शहराच्या उत्तरेकडील शेवटचे टोक म्हणजे किवळे व मामुर्डी ही गावे आहेत. पिंपरी-चिंचवड महापालिका भवनापासून (पिंपरी मेट्रो स्थानक) साधारण १२ ते १५ किलोमीटरवर ही गावे आहेत. ती आता किवळेतील मुकाई चौकापासून पिंपरी मेट्रो स्थानकाशी पीएमपीने जोडली गेली आहेत. अर्थात पिंपरी मेट्रो स्थानक ते मुकाई चौक किवळे अशी बससेवा पीएमपीने सुरू केली आहे.

# ‘रेडझोन’ला ‘लाल दिवा?’ सीमेबाबत संभ्रमावस्था कायम

## 'सॅटेलाइट'द्वारे मोजणी करून दहा महिने उलटून गेले, तरी अंतिम नकाशा तयार नाही

**पिंपरी | प्रतिनिधी**

देहूरोड आणि दिघी भागातील संरक्षित जागेची (रेड झोन) राज्य शासनाच्या भूमी अभिलेख विभागाने ‘सॅटेलाइट’द्वारे मोजणी करून दहा महिने उलटून गेले, तरी अंतिम नकाशा तयार झालेला नाही. नकाशाअभावी रेड झोन सीमेबाबत संभ्रमावस्था कायम आहे.

पिंपरी-चिंचवड शहरालगत देहूरोड आणि दिघीत संरक्षण विभागाचे क्षेत्र आहे. देहूरोड दारूगोळा कारखान्याच्या आणि दिघी मॅगझिन डेपोच्या बाह्य सीमाभिंतीपासून दोन हजार यार्ड (१.८२ किलोमीटर) परिघामध्ये रेड झोन आहे. रेड झोनमधील निवासी आणि व्यावसायिक मालमत्तांचे अचूक सीमांकन, त्यांची संख्या स्थानिक प्रशासनाकडे नाही. रेड झोनमध्ये बांधकाम करता येत नसतानाही अनधिकृतपणे निवासी बांधकामे मोठ्या प्रमाणात झाली आहेत.




रेड झोन क्षेत्रात गेल्या ४० वर्षांपासून तीन हजारांहून अधिक औद्योगिक आस्थापना कार्यरत आहेत. जुने, बैठे घर असलेल्या रहिवाशांना नव्याने बांधकाम करता येत नाही. रेड झोनच्या हद्दीमध्ये नागरिकांमध्ये संभ्रम असल्याने मोजणीची मागणी केली जात होती.

दिघी, भोसरी, वडमुखवाडी, तळवडे, रुपीनगर, यमुनानगर, निगडी, रावेत, किवळे भागात रेड झोन क्षेत्र आहे. तसेच, सांगवी, पिंपळे गुरव, पिंपळे निलख, पिंपरीगाव, कासारवाडी, दापोडी या भागांना लागूनही लष्करी आस्थापना आहेत. देहूरोड दारूगोळा कारखाना आणि दिघी मॅगझिन डेपोमुळे रेड झोन क्षेत्र जाहीर आहे. त्या हद्दीत बांधकामे करता येत नाहीत. सीमारेषेबाबत नागरिकांमध्ये संभ्रम होता. त्यामुळे संरक्षण विभागाच्या परवानगीनुसार एक कोटी १३ लाख रुपये खर्च करून रेड झोन हद्दीची नव्याने मोजणी करण्यात आली आहे.

संरक्षण विभागाच्या मदतीने, तसेच महापालिकेच्या सहकार्याने भूमी अभिलेख विभागाकडून रेड झोनचे सर्वेक्षण करण्यात आले. आता त्याचे नकाशात रूपांतर करून तो अंतिम नकाशा महापालिकेला उपलब्ध करून दिला जाणार आहे. सर्वेक्षण पूर्ण केल्यानंतर अवघ्या दोनच महिन्यांत अंतिम नकाशा तयार करून देण्याची ग्वाही भूमी अभिलेख विभागाने महापालिकेला दिली होती. परंतु, सर्वेक्षण होऊन दहा महिने उलटले, तरी नकाशा तयार झालेला नाही. परिणामी, महापालिकेच्या नगररचना, बांधकाम परवानगी आणि करसंकलन या विभागांकडून प्रशासकीय कार्यवाहीस अडथळे येत आहेत.

रेड झोन हद्दीचे सर्वेक्षण करताना भूमी अभिलेख विभागाला पूर्ण सहकार्य केले. सर्व हद्दी दाखवून दिल्या. आता त्याची नकाशावर नोंद केली जात आहे. रेड झोनचा अचूक नकाशा तयार करण्यात येत आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमुळे विलंब झाला आहे. येत्या पंधरा दिवसांत नकाशा उपलब्ध होण्याची शक्यता असल्याचे नगररचना विभागाचे उपसंचालक प्रसाद गायकवाड यांनी सांगितले.

### अनधिकृत बांधकामे

» यमुनानगर, निगडी, प्राधिकरण, भक्ती-शक्ती समूहशिल्प, रुपीनगर, तळवडे, टॉवर लाइन, कृष्णानगर, साने चौक, चिखली, दिघी, भोसरी, वडमुखवाडी, मोशी, बोपखेल आदी भागास रेड झोनचे प्रतिबंध लागू आहेत. महापालिकेकडून या भागात बांधकाम परवानगी दिली जात नाही. परिणामी, अनधिकृत बांधकामांची संख्या वाढत आहे. त्यात बहुमजली इमारतींचा समावेश आहे.

# हिंजवडी आयटी पार्क ते चाकण एमआयडीसी : नव्या वर्षात सुटो उद्योगांचे ग्रहण!

## हिंजवडी आयटी पार्क, चाकणसह इतर औद्योगिक क्षेत्रांत पायाभूत सुविधांची स्थिती दयनीय

**पिंपरी | प्रतिनिधी**

मर्सिडीज बेंझसारख्या कंपनीच्या कर्मचाऱ्यांचा दररोज एक तास वाहतूककोंडीत वाया जात असेल, यावरून एकंदरीत परिस्थितीचा अंदाज यावा. हिंजवडी आयटी पार्क, चाकणसह इतर औद्योगिक क्षेत्रांत पायाभूत सुविधांची स्थिती दयनीय आहे. यामुळे उद्योगांची चोहोबाजूंनी कोंडी होत आहे. नव्या वर्षात तरी उद्योगांना लागलेले हे ग्रहण सुटावे...

राज्यात औद्योगिक क्षेत्रात पुणे अग्रेसर आहे. देशातील माहिती-तंत्रज्ञान (आयटी) उद्योगाचे प्रमुख केंद्र म्हणून पुण्याची ओळख आहे. वाहननिर्मितीपासून आयटीपर्यंत पुण्याने आपले भक्कम स्थान निर्माण केले आहे. देशातील सॉफ्टवेअर निर्यातीत पुणे हे तिसऱ्या क्रमांकावर आहे. गेल्या आर्थिक वर्षात १ लाख ५ कोटी ८१८ कोटी



रुपयांची सॉफ्टवेअर निर्यात एकट्या पुण्यातून झाली. ही आकडेवारी केवळ सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्कमधील आहे. या पार्कबाहेरही अनेक आयटी उद्योग असून, त्यांच्याकडून होणाऱ्या निर्यातीचा यात समावेश नाही. त्यामुळे प्रत्यक्षात सॉफ्टवेअर निर्यात आणखी जास्त आहे. पुणे जागतिक पातळीवर झेंडा फडकावत असतानाच, उद्योगांची अपुऱ्या पायाभूत सुविधांमुळे होणारी कोंडी तेवढीच प्रकर्षाने समोर येत आहे. याचा परिणाम उद्योगांसह त्यातील मनुष्यबळावर होत आहे. या दृष्टीने वेळीच उपाययोजना करायला हव्यात अन्यथा स्पर्धेत पुणे मागे पडण्याची भीती आहे.

गेल्या काही वर्षांत उद्योगांचा विस्तार पुण्यासह पिंपरी-चिंचवड शहर आणि जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात वाढला आहे. नागरीकरण आणि उद्योग वाढत असताना पायाभूत सुविधा निर्मितीचा वेग कमीच राहिला. पर्यायाने शहरातील पायाभूत सुविधांवरील ताण वाढला. यातून हिंजवडीतील राजीव गांधी इन्फोटेक पार्क आणि इतर औद्योगिक क्षेत्रातील अपुऱ्या पायाभूत सुविधांचा प्रश्न वारंवार समोर येऊ लागला. त्यातच पुण्यातून काही कंपन्यांनी स्थलांतर केल्याचा दावा करण्यात आल्याने मोठा गदारोळ उडाला. कंपन्यांच्या स्थलांतराबाबत दावे-प्रतिदावे झाले, तरी या निमित्ताने अपुऱ्या पायाभूत सुविधांचा प्रश्न मात्र ऐरणीवर आला.

### घनकरचा व्यवस्थापन प्रकल्प मार्गी

» पुण्यातून उद्योगांचे स्थलांतर झाल्याचा मुद्दा उपस्थित झाल्याने येथील पायाभूत सुविधांबाबत सत्ताधाऱ्यांकडून पावले उचलण्यात आली आहेत. यामुळे दृश्य स्वरूपात बदल दिसत नसले, तरी पावले पडली, हेही नसे थोडके! हिंजवडीबाबत गेल्या वर्षी जुलैमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आढावा बैठक घेतली होती. नवीन सरकार स्थापनेनंतर उद्योगमंत्री उदय सामंत यांनी डिसेंबर महिन्यात बैठक घेतली. या दोन्ही बैठकांतील मुद्दे तेच होते. हिंजवडीतील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प मार्गी लागला असून, इतर पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या उभारणीबाबत केवळ प्रक्रिया सुरू आहे. कारण हिंजवडी अथवा इतर औद्योगिक क्षेत्रे विविध शासकीय यंत्रणांच्या अखत्यारित येतात. विविध शासकीय यंत्रणांचा समन्वय साधून एखादा प्रकल्प पुढे नेण्याचे आव्हान आहे. हे आव्हान सर्व सरकारी यंत्रणांनी पार पाडल्यास नवीन वर्षात पुण्यातील उद्योगांना लागलेले ग्रहण सुटेल, अशी आशा आहे.

# पोलीस आयुक्तांकडून गुंडांना कडक इशारा

## ‘बेकायदा धंदे, गुंडगिरी, तसेच जमिनीवरील ताब्याचे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत

**पुणे | प्रतिनिधी**

‘बेकायदा धंदे, गुंडगिरी, तसेच जमिनीवरील ताब्याचे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत. गुंडांनी सामान्यांना त्रास दिल्यास, त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल. कायद्याचे पालन करा अन्यथा शहर सोडून जा’, असा कडक इशारा पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सोमवारी दिला.

चोरट्यांकडून जप्त करण्यात आलेला दोन कोटी रुपयांचा ऐवज सोमवारी पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या हस्ते तक्रारदारांना परत करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, अतिरिक्त पोलीस आयुक्त प्रवीणकुमार पाटील, मनोज पाटील, शैलेश बलकवडे, परिमंडळ पाचचे पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे, गुन्हे शाखेचे उपायुक्त निखील पिंगळे यावेळी उपस्थित होते.



### न्यायालयीन प्रक्रियेसाठी पोलिसांचा पाठपुरावा आवश्यक

» चोरट्यांकडून जप्त करण्यात आलेला ऐवज तक्रारदारांना परत देण्यासाठी न्यायालयीन प्रक्रियेची पूर्तता करावी लागते. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी न्यायालयीन प्रक्रिया पार पाडण्यासाठी पोलिसांनी पाठपुरावा करणे गरजेचे आहे. दागिने मौल्यवान आहेत. मात्र, महिलांच्या भावना दागिन्यात गुंतलेल्या असतात. त्यामुळे सामान्य तक्रारदारांना न्याय देण्यासाठी पोलिसांनी न्यायालयीन प्रक्रिया जलदगतीने पार पाडण्यासाठी पाठपुरावा करावा, असे आदेश त्यांनी शहरातील सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रमुखांना दिले.

### नववर्षाची अनोखी भेट

» या कार्यक्रमात पोलीस आयुक्तांच्या हस्ते ८८ तक्रारदारांना दोन कोटी रुपयांचा ऐवज परत करण्यात आला. चोरट्यांकडून जप्त केलेला ऐवज पुन्हा मिळाल्याने तक्रारदारांच्या डोळ्यात अश्रू तरळले. दागिने परत मिळाल्याने नववर्षाची अनोखी भेट मिळाली, अशी भावना तक्रारदारांनी व्यक्त केली.

पोलीस आयुक्त अमितेश कुमार म्हणाले, ‘ पुणे पोलिसांच्या परिमंडळ पाचमधील विविध पोलीस ठाण्यांतील तपास पथकांनी घरफोडी, चोरी अशा गुन्ह्यातील मुद्देमाल चोरट्यांकडून जप्त केला. पोलिसांनी दोन कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. अशा उपक्रमांमुळे नागरिक, तसेच तक्रारदारांचा पोलिसांवरील विश्वास वाढतो. सामान्य नागरिक पोलिसांचे कान आणि डोळे आहेत. सामान्य नागरिकांना त्रास देणाऱ्या गुंडांना यापूर्वी समज दिली आहे. शहरात गुंडगिरीचे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत. ज्यांना कायदा पाळायचे नसेल, त्यांनी शहर सोडू जावे. कायदा-सुव्यवस्थेला बाधा पोहोचविणाऱ्या गुंडांविरुद्ध कडक कारवाई करण्यात येईल.

सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. अशा उपक्रमांमुळे नागरिक आणि पोलिसांमध्ये विश्वासाचे नाते घट्ट होईल, असे त्यांनी नमूद केले.

# शास्ताबादमध्ये 10 बकऱ्या तर दुडेत घोडा केला ठार

## संबंधित शेतकऱ्याचे 1 लाख ते 1. 50 लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज

**पुणे | प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील शास्ताबाद येथील बिबट्याच्या हल्ल्यात बकऱ्या १० ठार तर पाच जखमी झाल्याची घटना सोमवारी पहाटे शास्ताबाद शिवारात उघडकीस आली. त्यामुळे संबंधित शेतकऱ्याचे १ लाख ते १. ५० लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

तालुक्यातील शास्ताबाद येथील शेतकरी चंद्रकांत गोरडे यांची शास्ताबाद शिवारातील गट नंबर.९१ मध्ये वडिलोपार्जित शेती आहे. या शेतात त्यांनी पशुधनासाठी मोठी जाळी तयार केली आहे. या जाळीत त्यांनी बकऱ्या ठेवल्या होत्या. शेतकरी गोरडे यांनी रविवारी (ता.5 ) सायंकाळी ८ वाजताच्या सुमारास जाळी बंद करून व शेतातून घरी परत गेले. दरम्यान, रात्रीच्या सुमारास बिबट्याने जाळीच्या आत प्रवेश करून बकऱ्यांवर हल्ला चढवला. यावेळी बिबट्याने दहा बकऱ्याचा फडशा पाडला. तर, पाच बकऱ्या जखमी झाल्या होत्या. तसेच निमगाव दुडे येथील राहुल घुले यांचा घोडा बाहेर असताना बिबट्याने हल्ला करून ठार केले आहे.



जखमींपैकी एक बकरी (ता. ६) सायंकाळी सहाच्या सुमारास दगावली. अन्य जखमी बकऱ्यांवर उपचार सुरू आहेत.शेतकरी चंद्रकांत गोरडे हे आज सकाळी आठ वाजताच्या सुमारास शेतात गेले असता, सदर प्रकार उघडकीस आला. या घटनेत त्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. अन्य बकऱ्या जखमी असल्याने नुकसानीचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. माहिती मिळताच वनरक्षक गणेश पवार हनुमंत कारकूड कारकूड यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. या घटनेमुळे परिसरात बिबट्याची दहशत पसरली आहे. वनविभागाने संबंधित शेतकऱ्याला शासनाकडून नुकसान भरपाई मिळवून द्यावी. तसेच सदर बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे.

### बिबट्याची दहशत कायम

» काही दिवसांपूर्वी कान्हूर मेसाई शिवारात बिबट्याच्या हल्ल्यात एक शेतकरी जखमी झाला होता. शास्ताबाद शिवारात एका शेतकऱ्याला मादी बिबट्यासह दोन शावक मुक्तसंचार करताना दिसून आले होते. त्यापूर्वी चिंचोली मोराची, कान्हूर मेसाई, लाखेवाडी परिसरात बिबट्याचा धुमाकूळ सुरू होता. त्यावेळी बिबट्याच्या हल्ल्यात शेतकरी जखमी झाले होते. आता शास्ताबाद शिवारात बिबट्या अवतरला आहे. वनविभागाने या हिंस्त्रप्राण्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे.

### शेतकऱ्यांच्या अडचणीत वाढ

» सध्या रब्बीचा हंगाम असल्याने शेतकऱ्यांना रात्री अपरात्री पिकांना पाणी देण्यासाठी शेतात जावे लागते. परंतु तालुक्यातील विविध भागात बिबट्याचा मुक्तसंचार दिसून येत आहे. त्यामुळे शेतकरी व शेतमजुरांसह नागरिकांमध्ये भीती पसरली आहे. अनेक ठिकाणी मजूर वर्ग शेतात जाण्यास धजावत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची अडचण वाढली आहे. वनविभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी होत आहे.